# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणात विस्थापित झालेल्या संजय गांधी नगर कोलाड येथील २१ कुटूंबियांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१) ९८ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणात विस्थापित झालेल्या संजय गांधी नगर कोलाड येथील २१ कुटूंबियांना नुकसान भरपाई व त्यांचे पुनर्वसन अद्याप न झाल्याची बाब माहे १६ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच गेली ४५ वर्षे वास्तव्यास असलेल्या रहिवाशांच्या झोपडपट्टीची नोंद ग्रामपंचायत दप्तरी करण्यात आली नसल्याचेही उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्नांबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) कोलाड येथील २१ कुटूंबियांचे पुनर्वसन करण्यात न आल्याने त्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०६-२०१५) :** (१) होय, खरे आहे.

(२) सदर झोपडपट्टी ही राष्ट्रीय महामार्गाच्या जागेमध्ये बांधली असल्याने ते शासकीय जमिनीवर अतिक्रमण होते व ते बेकायदेशीर असल्याने हटविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर नागरीकांनी उपोषणाची नोटीस तहसिलदारांना दिली होती. तथापि त्यांनी या नागरीकांना उपोषण करण्यापासून परावृत्त केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गुन्हेगारीला आळा घालण्याबाबत**

**(२) ११८ (१५-०१-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या वर्षी अवघ्या १३ टक्के आरोपींना शिक्षा झाली असून देशात राज्याचा गुन्हेगारीत तिसरा क्रमांक लागत असल्याचे नुकत्याच प्रसिध्द झालेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालातील आकडेवारीत दिनांक ४ जुलै, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हेगार वृत्तीला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) महासंचालक, कार्यालयामार्फत सर्व पोलीस घटक प्रमुखांना गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचना पाठविल्या आहेत.
पोलीस स्टेशन हद्दीत बीटमार्शल, साध्या वेषातील गस्त, कोंबिंग ऑपरेशन राबविणे,
शाळा कॉलेज, गर्दीची ठिकाणी, मार्केट, रेल्वे स्टेशन या ठिकाणी गस्त वाढविण्यात आली आहे. तसेच महिला छेडछाड पथके स्थापन करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेवाळा ( ता.कळमनूरी, जि. हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्रात अत्याधुनिक यंत्र व आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत**

**(३) १४३ (२३-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवाळा (ता.कळमनूरी, जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्रात अत्याधुनिक आरोग्य सुविधा व यंत्र उपलब्ध नसल्याने सोयीसुविधेचा बोजवारा उडाल्याने गरीब रुग्ण खाजगी दवाखान्यात आसरा घेत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आरोग्य उपकेंद्राची दुरावस्था दूर करण्यासाठी कोणत्या तातडीच्या उपपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,
(३) अद्याप, कोणतीही उपाययोजना करण्यात आले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

उपकेंद्र स्तरावर आवश्यक असणारी यंत्रसामुग्री उपलब्ध आहे व त्याचा वापर आरोग्य सेवा देण्यासाठी नियमित केला जातो. तसचे सर्व सेवा मोफत दिल्या जातात.

(२) उपकेंद्रामध्ये आरोग्य सेवा सुरळीतपणे देण्यात येत आहेत. तसेच शेवाळा उपकेंद्राचे नविन इमारत बांधकाम सन २०१५-१६ च्या पीआयपी मध्ये एनआरएचएम मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ चौपदरीकरणाच्या प्रस्तावाबाबत**

**(४) ५७६ (२२-११-२०१४). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ वर होणारे अपघात, कशेडी घाटात दरड कोसळणे, महामार्ग बंद होणे या कारणास्तव केंद्र शासनाने या कामास मंजूरी दिली असून भुसंपादनाची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्ग चौपदरीकरणाच्या कामास किती रकमेची तरतूद केली आहे व किती रक्कम खर्च झाली व अद्‌याप किती रक्कमेची आवश्यकता आहे सदर रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर कामाची सद्‌यस्थिती काय आहे व सदर काम तातडीने पूर्ण करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) सदर मार्गावर अपघातग्रस्तांना तातडीने वैद्‌यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे तसेच या मार्गावर कोणकोणत्या ठिकाणी ट्रामाकेअर सेंटर उभारण्यात आले आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१४) :** (१) भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून संयुक्त मोजणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) राष्ट्रीय महामार्ग क्र. १७, इंदापूर ते कशेडी (कि.मी. ८४.०० ते १६१.००) या लांबीतील महामार्गाचे चौपदरीकरणाच्या सुसाध्यता अहवालात रु.११२६ कोटी रकमेस तत्वतः मंजूरी दिलेली आहे.

कशेडी ते झाराप या लांबीतील महामार्गाच्या चौपदरीकरणास रु. २८८१.२४ कोटी रकमेस तत्वतः मान्यता मिळाली आहे.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील १४ पुलांच्या चौपदरीकरण कामी रु. १८७.७९ कोटी रकमेची अंदाजपत्रीय तरतूद असून त्यावर आज अखेर रु. ७.८६ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(३) सद्‌यस्थितीत भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. चौपदरीकरणांतर्गत १४ पुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) महाड व संगमेश्वर येथे ट्रामाकेअर सेंटर उभारण्यात आले आहेत.

---

**मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर रस्त्याचे चौपदरीकरणाबाबत**

**(५) ७९६ (२२-१२-२०१४). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर या मार्गास चौपदरीकरणासाठी चार वर्षापूर्वी मंजूरी देण्यात आली तसेच चौपदरीकरणाच्या कामाला सुरुवात होऊनही ठिकठिकाणी रस्त्याची दुरावस्था झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाचा ठेका संबंधित ठेकेदारांना केव्हा देण्यात आला, तसेच काम पूर्ण करण्याची मुदत किती होती, तसेच सदर ठेकेदारांनी मुदतीत काम पूर्ण केले नसल्याचे दिसून येत असल्याने शासनाने ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) पनवेल ते इंदापूर कि.मी ००/०० ते ८४/०० या लांबीतील महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम मे.सुप्रीम पनवेल इंदापूर टोलवेज प्राय.लि. यांचेमार्फत १९.१२.२०११ पासून प्रगतीपथावर आहे. सदर बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी हा १६.०६.२०१४ आहे, तथापि माहे मार्च, २०१६ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) कर्नाळा पक्षी अभयारण्य व संवेदनशील क्षेत्र मधील राष्ट्रीय वन्यजीवन मंडळ यांची मंजूरी प्राप्त होणे व सिडकोची अस्तित्वातील पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी स्थलांतरीत करणे व मौजे काराव येथील भूसंपादन व वडखळ बाह्य वळणाकरीता मिठागराची जागा वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय भारत सरकार यांचेकडून हस्तांतरीत होणे, राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण काढणे व उद्योजकामार्फत काम करण्याची संथ गती ही कारणे आहेत.

सद्यस्थितीत ३५% चौपदरीकरणाचे काम पुर्ण झालेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

---

**माळगाव (ता.मालवण, जि.सिंधूदुर्ग) येथील जिल्हा परिषद शाळा व हायस्कुलमध्ये होत असलेल्या चोऱ्या रोखण्याबाबत**

**(६) ८५० (२२-१२-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळगाव (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील ॲड गुरुनाथ कुलकर्णी न्यू इंग्लिश स्कुल, बिळवस हायस्कुल, चाफेखोल हायस्कुल, मसुरे-भोगलेवाडी हायस्कुल व बिळवस न्यू इंग्लिश स्कुल अशा पाच हायस्कुलची कार्यालये माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास फोडून संगणक, प्रिंटर, पेन ड्राईव्ह व अन्य काही साहित्यांसह ५ हजारांची रोकड मिळून सुमारे ४० हजारांचा ऐवज चोरीला गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन महिन्यांपासून जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा व हायस्कुलची कार्यालये फोडून चोऱ्या करण्याचे सत्र सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार चोरांना अटक करून चोरी गेलेला ऐवज जप्त करण्यात आला आहे काय, तसेच सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०६-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर गुन्ह्याबाबत पोलीस ठाण्यात नोंद केली आहे. पोलीसांकडून तपास सुरु आहे. जिल्हा परिषदेच्या १ शाळेतील चोरी प्रकरणी संशयीत चोरांना पकडण्यात आले होते. सदर घटनांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून शाळेच्या सुरक्षेबाबत आवश्यक उपाययोजनाबाबत केंद्रप्रमुख व गट शिक्षणाधिकारी यांचेमार्फत मुख्याध्यापकांना सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील शिवणे ते खराडी नदीकाठावरील रस्त्याच्या कामाबाबत**

**(७) ११५५ (२३-१२-२०१४). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील शिवणे ते खराडी नदीकाठावरील रस्त्याच्या कामासाठी हरित क्षेत्रातील भूसंपादनासोबतच रेडलाईन व ब्ल्यू लाईन मधून जाणाऱ्या रस्त्यासाठीही भूसंपादन करताना १०० टक्के टीडीआर देण्याचा आदेश शासनाने माहे ऑक्टोबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या कित्येक वर्षांपासून या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१५) :** (१) होय. मात्र यासंदर्भात शासनाने निर्णय ऑक्टोबर २०१४ मध्ये घेतलेला नसून सदर निर्णय दि. ३०/१२/२०१३ रोजीचे पत्र क्र. टिपीएस-१८१३/३६२०/प्र.क्र.५८०/१३/नवि-१३ अन्वये महानगरपालिकेस कळविला आहे.
(२) नाही.

ज्या ठिकाणी जागा ताब्यात आहे. अथवा जागा मालकांची संमती आहे तेथे काम सुरु आहे. मात्र उर्वरित जागा पुर्ण महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने तेथे रस्ताचे काम प्रलंबित आहे.

(३) रस्त्याच्या जागा तडजोडीने ताब्यात घेण्यासाठी तसेच शासन निर्णयानुसार टी.डी.आर. मोबदला स्वरुपात जागा ताब्यात देण्यासाठी जागा मालकांकडे रस्त्याचे क्षेत्र ताब्यात देण्याबाबात प्रस्ताव दाखल होत नसल्याने रस्त्याचे काम पूर्ण होण्याच्या कालावधी निश्चितपणे नमूद करण्यात येत नाही.

---

## हडपसर मतदार संघातील (जि.पुणे) पुणे-सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(८) ११५९ (२२-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर मतदार संघातील (जि.पुणे) पुणे-सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरु असताना आकाशवाणी केंद्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रविदर्शन ते कवडीपाट टोल नाका या ५ कि.मी च्या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम विद्युतवाहिनीच्या स्थलांतराअभावी काही महिन्यांपासून रखडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाखालून महापालिकेची जलवाहिनी गेलेली आहे, हे या जलवाहिनीची ठिकठकाणी गळती होत असल्याने महामार्गाखालून रस्त्यावर पाणी येत आहे, त्यामुळे रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्याचे तातडीने रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासन काया कार्यवाही करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०६-२०१५) :** (१) होय,

(२) विद्युतवाहिनीच्या स्थलांतराचे काम पूर्ण झालेले आहे.

(३) पाईपलाईन स्थलांतरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अत्याधुनिक नार्को तपासणी सेंटर सुरु करण्याबाबत

**(९) १२१५ (२३-१२-२०१४). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढत असलेली गुन्हेगारी व गुन्हेगारीचे प्रमाण सिध्द करण्यासाठी अनेक वेळा गुन्हेगारांची नार्को टेस्ट करण्याची आवश्यकता भासत असताना राज्यात अत्याधुनिक असे नार्को तपासणी सेंटर नसल्यामुळे पोलिसांना यासाठी बाहेरील राज्यात जाऊन ही तपासणी करावी लागत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकत्याच जवखेडा जिल्हा अहमदनगर येथील दलित हत्या केलेल्या आरोपींची नार्को तपासणीही बाहेरील राज्यात करावी लागणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा नार्को टेस्ट करण्यासाठी शासनाच्यावतीने राज्यातील प्रमुख शहरांमध्ये अत्याधुनिक सोई सुविधांसह नवीन सेंटर चालू करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मुंबई प्रयोगशाळेत सुविधा उपलब्ध असून इतर शहरांमध्ये मानसशास्त्र विभागातील आवक प्रकरणांची संख्या अत्यल्प असल्यामुळे राज्यातील प्रमुख शहरांमध्ये अत्याधुनिक सोई सुविधासंह नविन सेंटर चालू करण्याची सध्या आवश्यकता वाटत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: विदर्भात उद्योग व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात बाल कामगारांचे शोषण होत असल्याबाबत**

**(१०) १२४१ (२३-१२-२०१४). श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात उद्योग व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात बाल कामगार काम करीत असून त्यांचे शोषण होत असल्याचे दिनांक १ जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालमजुरीत अडकलेल्या मुलांना मुक्त करण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी छाप्यांचे सत्र सुरु असले तरी त्यावेळी पकडलेली ७६.४७ टक्के मुले काही काळाने पुन्हा बालमजुरी करीत असल्याचे दाहक वास्तव "क्राय" या मुलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या सामाजिक संस्थेच्या सर्वेक्षणातून माहे ऑगस्ट, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालमजुरीतून मुलांची सुटका करण्याची प्रक्रिया जास्त पध्दतशीर व सुरळीत होण्यासाठी बालमजुरीतील मुलांचे पुर्नवसन करणारी सक्षम यंत्रणा शासनाने उभारुन बालमजुरी करीत असलेल्या मुलांचे पुर्नवसन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, बाल कामगार उल्लंघन करणाऱ्या किती उद्योगांवर व कंत्राटदारावर शासनाने कारवाई केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) कामगार आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील कृतीदलामार्फत टाकण्यात आलेल्या धाडसत्रांमध्ये आढळलेले व मुक्त केलेले बाल कामगार पुन्हा बालमजुरी करताना आढळलेले नाहीत.

"क्राय" या संस्थेच्या सर्वेक्षणातून पुन्हा बालमजुरी करीत असल्याबाबतची माहिती शासनाकडे प्राप्त झालेली नाही.
(३) बालमजुरीतून मुक्त केलेल्या मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असून, त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) व (५) बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अंतर्गत कृती दलामार्फत दिनांक १.४.२०१३ ते ३१.१२.२०१४ या कालावधीत नागपूर विभागात (विदर्भ विभागात) टाकण्यात आलेल्या ९८ धाडसत्रात एकूण १९०२ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १२ आस्थापनेतील २० बालकामगारांना मुक्त करण्यात आले. तसेच या १२ आस्थापना मालकांना अटक करण्यात आली असून, ०९ बालकामगारांना बालगृहात दाखल करण्यात आले. बालकामगार अधिनियमांतर्गत एकूण ६ खटले दाखल करण्यात आले. उर्वरीत ५ आस्थापना मालकांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु असून, चौकशीअंती १ बालकामगार १४ वर्षावरील आढळल्याने, संबंधित आस्थापना मालकाविरुध्द कोणतीही कायदेशीर कार्यवाही करता आली नाही.

---

## वाडा ग्रामीण रुग्णालय (जि.ठाणे) येथे गरोदर महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याबाबत

**(११) १२५६ (२२-१२-२०१४). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा शहरातील अंजनीनगर (जि.ठाणे) येथील मंदा मोहिते या गरोदर महिलेचा वाडा ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीमुळे उपचारा दरम्यान माहे ऑक्टोबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चैाकशी करुन संबंधीत दोषी डॉक्टरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे,
सदर महिलेचा मृत्यु झाला तथापि तो हलकर्जीपणामुळे झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालय, वाडा जिल्हा ठाणे येथे दि.२९/१०/२०१४ रोजी प्रसुतीसाठी दाखल झालेल्या महिलेच्या प्रसुती दरम्यान गुंतागुंत आढळून आल्याने तिला सामान्य रुग्णालय, ठाणे येथे संदर्भित करण्यासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु रुग्णाचे नातेवाईकांनी संदर्भ सेवेस प्रथम नकार दिला. तथापि, नंतर रुग्णास जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे दि.३०/१०/२०१४ रोजी रात्री २.४५ वा. नातेवाईकाच्या सहमतीने संदर्भीत करण्यात आले तथापि, रुग्णाचा वाटतेच मृत्यु झाला.

जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांच्या अहवालानुसार मृत्युचे कारण Pulmonary Embolism with Deep transverse arrest असे नमुद केले आहे.

---

**प्राथमिक आरोग्य केंद्र कुरूड (जि.गडचिरोली) या आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याने महिला कर्मचाऱ्यांना दबावाखाली ठेवून नियमबाहयरित्या वस्तुंची खरेदी केल्याबाबत**

**(१२) १३८६ (२३-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक आरोग्य केंद्र कुरूड (जि.गडचिरोली) या आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याने महिला कर्मचाऱ्यांना दबावाखाली ठेवून नियमबाहयरित्या काही वस्तुंची खरेदी करून गैरव्यवहार केल्याचे दिनांक ०४ नोव्हेंबर २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा सिलबंद लिफाफ्यात न मागता स्वत:च्या हस्ताक्षरानेच बनावटी दिनांक नसलेले निविदा तयार करुन शासनाची दिशाभुल आणि फसवणुक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) स्थानिक ग्रामस्तरावर ए.एन.एम.महिला कर्मचारी तथा सरपंच स्थानिक गावाची गरज विचारात घेवून व ए.एन.एम. व सरपंच यांची संमती घेवून खरेदी करणे बंधनकारक होते, परंतु संबंधिताचे अज्ञानाचा गैर फायदा घेवून वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वत: खरेदी केली, हे ही खरे आहे काय,

(४) ज्या तारखेची खरेदीचे बिल ८५०० रू. दाखविण्यात आलेले असुन त्या समवस्तुची त्याच पुरवठादार विक्रेत्याने रू.७०००/- ची निविदा दिलेली असल्याने, संबंधीत गैरव्यवहाराची चौकशी समिती गठीत करून करण्यात येणार आहे काय,

(५) संबंधीत प्रकरणात दोषी आढळल्यास शासनाच्या संबंधी विभागाकडून त्यांच्याविरूद्ध तात्काळ शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) सन २०१३-१४ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुड अंतर्गत उपकेंद्र कुरुड येथे डिजीटल फीटल मॉनिटर हे उपकरण खरेदी करण्यात आले. सदर उपकरण खरेदी करण्यासाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार तीन पुरवठादारांनी सादर केलेले दर रु.८,.५००/-, रु.

९,२००/-, व रु. ९,५००/- याप्रमाणे होत. प्राप्त तीन्ही दरपत्रकांची तुलना केल्यानंतर सर्वात कमी दर असलेल्या पुरवठादाराकडून रु. ८,५००/- या दराने डिजीटल फीटल मॉनिटर हे उपकरण खरेदी करण्यात आले.

सदर खरेदी प्रक्रिया करण्यापूर्वी उपकेंद्र बळकटीकरण ची सभा सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली घेवून खरेदीसाठी ठराव मांडून रितसर मंजूरी घेण्यात आलेली आहे. तसेच पुरवठादाराला आरोग्यसेविका व सरपंच यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे धनादेश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांची नियमबाहय नेमणूक केल्याबाबत**

**(१३) १३९२ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली सन १९९९ ते २००० या कालावधीत प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांची नियमबाहय नेमणूक करण्यात आल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची टक्केवारी किती आहे व त्यांची प्रमाणपत्र तपासणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) नाही.

प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांची नियमबाहय नेमणूक करण्यात आल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ पूर्वीच निदर्शनास आले आहे.

(२) सन १९९९-२००० रोजी ग्रंथालय संचालनालयात एकूण ४६९ मंजूर पदे होती. या पदांच्या ५% आरक्षणानुसार प्रकल्पग्रस्तांची २३ पदे रिक्त येतात. परंतू प्रत्यक्षात ३० पदे भरली गेली आहेत. म्हणजेच एकूण संवर्गाच्या ६.५% प्रकल्पग्रस्तांची पदे भरण्यात आलेली आहेत.

यातील काही कर्मचा-यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात आली आहे.

(३) प्रकल्पग्रस्तांना नियमबाहय नेमणुका केल्याबाबत तत्कालीन ग्रंथालय संचालकांच्या निवृत्तीवेतनातून कायमस्वरूपी १०% कपात करण्याच्या शिक्षेचे आदेश दि. २३.५.२०११ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच शासनाच्या दिनांक २७.१.२०१४ च्या पत्रान्वये सूचित केल्यानुसार ग्रंथालय संचालनालयाच्या दिनांक २९.१.२०१४ च्या आदेशान्वये या प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्याच्या नियुक्ता नियमबाह्य ठरवुन रद्द करण्यात आल्या होत्या. या निर्णयाविरोधात सदरहू कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दावा दाखल केला होता. त्यासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने, या प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्ववत व कायम ठेवण्याबाबत, दिनांक १२.८.२०१४ अन्वये आदेश पारित केले आहे. तसेच या कर्मचाऱ्यांना कायम करुन त्यांच्या सेवेमध्ये हस्तक्षेप करुन नये, अशा अंतिम निकाल दिला आहे.

त्यानुसार शासनाच्या दिनांक १९.११.२०१४ च्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार, ग्रंथालय संचालनालयाच्या दिनांक २४.११.२०१४ च्या आदेशान्वये प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्ववत ठेवण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळांना शिक्षण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी घेण्याबाबत

**(१४) १५३२ (२९-१२-२०१४). श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळांना शिक्षण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी घेणे अनिवार्य असणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोखंडवाला कांदिवली (पूर्व) परिसरामध्ये अनधिकृत रित्या अवजड वाहणे व भंगार रिक्षा ह्यांच्या पार्किंगमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(१५) १५९१ (२२-१२-२०१४). श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोखंडवाला कांदिवली (पूर्व) परिसरामध्ये अनधिकृत रित्या अवजड वाहणे व भंगार रिक्षा ह्यांच्या पार्किंगमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक विभागाने त्या परिसराची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीत काय निष्पन्न झाले आहे,
(४) असल्यास, अवजड वाहणे व भंगार रिक्षा पार्क करुन वाहतूकीची कोंडी करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) वाहतूक नियंत्रण शाखा, मुंबई पोलीस आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यातर्फे संयुक्त पाहणी करण्यात आली आहे या पाहणीमध्ये पुढील बाबी निदर्शनास आल्या आहेत :-

लोखंडावाला, कांदिवली (पूर्व) भागात कांदिवली (पूर्व) स्टेशनपासून लोखंडवाला सर्कल पर्यंत ६० फूटी रस्ता असून त्यावर मोठ्या प्रमाणात दुहेरी वाहतूक चालते, या मार्गावरील वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच सदर मार्गावरील महिंद्रा कंपनीच्या येलो गेट मधून जड अवजड वाहनांची वाहतूक नोव्हेंबर, २०१४ पर्यंत होत होती. तसेच येलो गेट येथील नाल्याजवळ पाईलपाईनचे काम सुरु असल्याने एक वाहिनी बंद असल्याने बॉटलनेक निर्माण होतो. आणि आकुर्ली मार्गावरील दुभाजक उखडल्याने पादचारी दुचाकी रिक्षा कोणत्याही ठिकाणाहून रस्ता क्रॉस करता वा वळवितात. यामुळे वाहतुकीचा वेग मंदावतो.
(४) महिंद्रा कंपनीच्या यलोगेटमधून होणारी अवजड वाहनांची वाहतूक कंपनीच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावरील ब्लू गेट व ठाकूर श्याम नारायण मार्गावरील ग्रीन गेट या पर्यायी रस्त्यावरुन वळविण्यात आली आहे. संभाजी नगर चौकी ते लोखंडवाला सर्कल येथील रोडवरती नो-पार्किंगचे तसेच संभाजीनगर चौकी ते लोखंडवाला सर्कल सकाळी ८.०० ते १२.०० वाजेपर्यंत व सायंकाळी ५.०० ते ९.०० वाजेपर्यंत अवजड वानांवर नो-एन्ट्रीचे निर्बंध लागू असल्याने सदर नियमांचे उल्लंघन करणा-या एकूण ८५९ अवजड वाहनांवर तसेच एकूण ५,४०९ रिक्षाचालकांवर गतवर्षी विविध गुन्ह्यांतर्गत कांदिवली वाहतूक विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. तसेच भंगार रिक्षा गॅस कटरने तुकडे करुन मोडीत काढल्या जातात.

---

### जळकोट (जि.लातूर) येथे महावितरणचे उपविभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत

**(१६) १६६३ (२३-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळकोट (जि.लातूर) या तालुक्याची निर्मिती होऊन १३ ते १४ वर्षे झाली आहेत तेव्हा पासून महावितरणकडून मुंबईच्या मुख्य कार्यालयाकडे जळकोट येथे महावितरणचे उपविभागीय कार्यालय सुरू करण्यासाठी वारंवार प्रस्ताव पाठविण्यात आले असून महावितरणकडून सतत टाळाटाळ करण्यात येत असल्याने एक महिन्याच्या आत जळकोट येथे महावितरणचे उपविभागीय कार्यालय सुरु करण्यात यावे, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा तालुक्यातील सामाजिक संघटनांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन उपलब्ध नसल्याच्या नावाखाली महावितरण कंपनी जाणीव पूर्वक सतत टाळाटाळ करत असते, परंतु जळकोट येथे जमीन उपलब्ध असून ही जमीन हस्तांतरीत करण्याची कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळकोट येथे महावितरणाचे उपविभागीय कार्यालय सुरु करण्यासंदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे काय,
(४) नसल्यास, अद्‌याप कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०६-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) जळकोट येथे महावितरण कंपनीचे उप विभागीय कार्यालय निर्माण करण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर कार्यालय ग्राहक संख्येच्या मानंकांची पूर्तता करत नसल्यामुळे, तेथे उपविभागीय कार्यालय मंजूर झालेले नाही. उपविभागीय कार्यालय सुरु करण्याबाबतचा महावितरण कंपनी सर्वकष आढावा घेत असून ग्राहकाभिमुख उत्तम व तत्पर सेवा देण्याकरीता, भौगोलिकदृष्ट्या ग्राहकांच्या सोयीचे असल्यास, व उपविभागीय कार्यालय निर्माण करण्यासाठी निश्चित केलेली आवश्यक, ग्राहक मानंकांची पूर्तता झाल्यास, उप विभागीय कार्यालय प्रचलित नियमानुसार सुरु केले जाईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१७) १७०५ (२२-१२-२०१४). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. वैभव पिचड (अकोले), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्‌यपीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्‌यापीठांना रिक्त पदांवर प्राध्यापकांची तात्काळ भरती करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोस्टर अभावी प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न क्र.१ व २ नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) विद्‌यापीठ अनुदान आयोगाने विद्‌यापीठांना दिनांक १२/११/२०१४ च्या पत्रान्वये प्राध्यपकांची तात्काळ भरती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत व नुसार शासनाने दिनांक २२/०१/२०१४ व दिनांक ११/०६/२०१४ च्या निर्णयान्वये आरक्षणाची कार्यपध्दती विहीत केली आहे. तसेच दिनांक २१/०२/२०१५ च्या निर्णयान्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास ईएसबीसीसाठी असलेल्या १६ टक्के आरक्षणास स्थगिती दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कान्हेफाटा (ता.मावळ, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या कर्मचारी निवासस्थानाची झालेली दुरवस्था**

**(१८) २१७५ (२२-१२-२०१४). श्री. संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कान्हेफाटा (ता.मावळ, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या कर्मचा-यांच्या शासकीय निवासस्थानाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही इमारतीतील विद्युत पुरवठा खंडीत झाला आहे, त्यामुळे कर्मचा-यांना गैरसोयीशी सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधीची तरतुद करुन तात्काळ दुरुस्ती करणेबाबत संबंधितांना आदेश देण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, दुरुस्तीचे काम केव्हा पुर्ण होणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय. काही निवासस्थानांतील संबंधित कर्मचा-यांनी विद्युत देयके वेळेवर न भरल्याने त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. आता या कर्मचा-यांनी थकीत देयके भरली असल्याने त्याचा विद्युतपुरवठा सुरळीत करण्याबाबत वीज वितरण कंपनीला कळविण्यात आले आहे.

(३) व (४) याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधी उपलब्धततेनुसार दुरुस्तीचे काम प्राधान्याने करुन घेण्यात येईल.

---

**जळगांव जिल्हयातील सामान्य रुग्णालयातून अपंगत्वाची चार बनावट प्रमाणपत्र वितरीत करण्यात आल्याबाबत**

**(१९) २१९५ (२३-१२-२०१४). श्री. सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील सामान्य रुग्णालयातून अपंगत्वाची चार बनावट प्रमाणपत्र वितरीत करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून त्यावर ५२ टक्के दाखविण्यात आले असल्याची बाब दिनांक १० ऑक्टोंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) जळगांव सामान्य रुग्णालयातून बोगस अपंगत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित झाल्याचे आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत मोफत उपचार करण्याबाबत**

**(२०) २३०८ (२३-१२-२०१४). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत १९७ प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हा रुग्णालयात सद्यःस्थितीत १३१ प्रकारच्याच आजारांवर उपचार करण्याची सुविधा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही मर्यादा तातडीने वाढविण्यात यावी असे निर्देश जळगांवचे जिल्हाधिकारी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) या प्रकरणी अद्यापही कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) नाही, राजीव गांधी जीवदायी आरोग्य योजनेतंर्गत एकूण ९७१ प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जातात.

(२) नाही.

सदर योजनेतंर्गत समाविष्ट ९७१ प्रकारच्या आजारांपैकी १३१ आजारांवरील उपचार हे केवळ शासकीय रुग्णालयांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. जळगांव जिल्हा रुग्णालयात योजनेतंर्गत एकूण २९१ आजारांवरील उपचार करण्यात येतात.

(३) नाही.

जिल्हा रुग्णालय, जळगांव यांचे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत कामकाज असमाधानकारक असल्यामुळे त्यात सुधारणा करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक १२ नोव्हेंबर २०१४ रोजी झालेल्या जिल्हा नियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांना दिले होते.

(४) जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिलेल्या निर्देशानुसार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता पुर्णवेळ वैद्यकीय समन्वयकाची नेमणुक केली असुन, न्युरो सर्जन व युरोसर्जन यांचीही मानधन तत्वावर नेमणुक करण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांच्या स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर शहरात मोठ्या प्रमाणात अवैध उद्योगधंदे सुरू असून घरफोड्या, चो-या, सोनसाखळी चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२१) २३५८ (२२-१२-२०१४). श्री. संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरात मोठ्या प्रमाणात अवैध उद्योगधंदे सुरू असून घरफोड्या, चो-या, सोनसाखळी चोरीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अहमदनगर शहरातील अवैधधंदे, घरफोड्या, चो-या, सोनसाखळी या घटनांना प्रतिबंध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१५) :** (१) नाही, सन २०१३ च्या तुलनेत सन २०१४ मध्ये अहमदनगर शहरात घरफोडी, चोरी व सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात घट झालेली आहे.
(२) व (३) अहमदनगर शहरात दारुबंदी शिर्षकाखाली २०१३ मध्ये २२२ दाखल प्रकरणात २४८ आरोपींना अटक करून रु.८,६५,३६७/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. त्यातुलनेत सन २०१४ मध्ये १२७ प्रकरणात १५७ आरोपींना अटक रून रु.३,२२,६१४/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

विनापरवाना बेकायदा जुगार या शिर्षकाखाली सन २०१३ मध्ये २५३ प्रकरणात ६१० आरोपी अटक करुन रु.३४,५५,१९९/- किंमतीचे जुगारीचे साहित्य जप्त केले त्या तुलनेत सन २०१४ मध्ये १३५ दाखल गुन्ह्यात ४२३ आरोपींना अटक करून रु.१२,३४,८२७ किंमतीचे जुगारीचे साहित्य जप्त केले आहे.

घरफोडी शिर्षकाखाली सन २०१३ मध्ये १४७ दाखल गुन्ह्यापैकी १६ गुन्हे उघडकीस आणून रु.१,४४,४४३/- किंमतीचा चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे. त्या तुलनेत सन २०१४ मध्ये ९४ दाखल गुन्ह्यापैकी २४ गुन्हे उघडकीस आणून रु.३,६१,२००/- किमतीचा चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला होता.

चोरी या शिर्षकाखाली सन २०१३ मध्ये ३९९ दाखल गुन्ह्यापैकी ९७ गुन्हे उघडकीस आणून रु.१६१२६४३०/- किंमतीचा चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे. त्या तुलनेत सन २०१४ मध्ये २६३ दाखल गुन्ह्यापैकी ९८ गुन्हे उघडकीस आणून रु.८३९६५८२/- किमतीचा चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे.

सोनसाखळी चोरी संदर्भात सन २०१३ मध्ये ५९ दाखल गुन्ह्यापैकी २६ गुन्हे उघडकीस आणून रु.७३३७५०/- किमतीचा चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे. त्या तुलनेत सन २०१४ मध्ये ४० दाखल गुन्ह्यापैकी ०९ गुन्हे उघडकीस आणून रु.१,८५,०००/- किमतीचा चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला आहे.

घरफोड्या, चोऱ्या व सोनसाखळी गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी दरोडा प्रतिबंधक उपाययोजनेतंर्गत प्रभावी गस्त नेमण्यात येते. तसेच बीट मार्शल पेट्रोलिंग नियमित कार्यरत आहे. नाकाबंदी करणे तसेच संशयीत व गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येते.
(४) विलंब झालेला नाही.

---

**नविन पनवेल येथे मुस्लिम बांधवासाठी स्मशानभूमीसाठी जागा नसल्याबाबत**

**(२२) २४६९ (२३-१२-२०१४). श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन पनवेल येथील खांदा वसाहतीत राहणा-या मुस्लिम बांधवांनी त्यांना स्मशानभूमीसाठी जागा मिळावी म्हणून सिडको महामंडळाने मागणी केली आहे काय,

(२) असल्यास, मुस्लिम समाजासाठी स्मशानभूमीकरीता भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत सिडको महामंडळाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१५) :**(१) व (२) होय, मुस्लिम समाजासाठी दफन भूमीसाठी भूखंड क्र.बी-३, सेक्टर-१२, क्षेत्र ४००२.७३ चौ.मी. हा भूखंड भाडेतत्वावर वाटप केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रात सिडकोने बांधलेल्या इमारतींमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(२३) २४७१ (२३-१२-२०१४). श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रात सिडकोने बांधलेल्या इमारतींमधील रहिवाशांनी आपल्या गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत केल्यानंतर कार्यालयीन कामासाठी नाममात्र दराने जागा मिळावी म्हणून सिडकोकडे मागणी केली असता सिडको त्यासाठी व्यापारी दर आकारात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गृहनिर्माण संस्थांना व्यापारी दर परवडत नसल्याने जागेअभावी त्यांना संस्थेचे कामकाज करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थांना सिडकोने शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय अद्यापी निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील एक हजार शाळात परिवहन समितीची स्थापना केली नसल्याबाबत**

**(२४) २५१३ (२२-१२-२०१४). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील एक हजार शाळात अद्याप परिवहन समितीची स्थापनाच केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित शाळा व्यवस्थापनेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी पुणे जिल्ह्यामार्फत माहे जून, २०१४ पासून परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांमार्फत तालुका निहाय गट शिक्षणाधिकारी यांच्या समवेत सभा घेऊन सदर सभेमध्ये कायम विना अनुदानित /अंशत:अनुदानित/अनुदानित शाळेतील मुख्याध्यापकांना / त्यांच्या प्रतिनिधींना परिवहन समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. जरी शाळेस परिवहन सेवा उपलब्ध नसेल तरी सुध्दा परिवहन समिती स्थापन करणे आवश्यक आहे, अशा सूचना सभेमध्ये देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे शाळांमध्ये परिवहन समिती गठीत केलेली आहे व त्यांचे कार्यवाही नियमितपणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या तुटवड्यामुळे होत असलेली अवैध औषध विक्री**

**(२५) २६५० (१५-०१-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषधविक्रीच्या क्षेत्रात अजूनही रजिस्टर्ड फार्मासिस्ट नसल्यामुळे अवैध औषधविक्रेते आणि ड्रगमाफिया खुलेआम विक्री करीत असल्यामुळे रुग्णांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याबाबतची तक्रार युनियन ऑफ रजिस्टर्ड फार्मासिस्टस संघटनेने शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फार्मासिस्टशिवाय औषधविक्री करणाऱ्यांचे परवाने कायमचे रद्द करावेत तसेच त्यांच्या नातलगांनाही पुन्हा परवाने देण्यात येऊ नयेत याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :**(१) होय,

युनियन ऑफ रजिस्टर्ड फार्मासिस्ट या संघटनेने दिनांक ११/११/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार केली होती.

(२) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ मधील नियम ६४ व ६७ च्या तरतुदींनुसार औषध विक्री परवाने दिले जातात. सदर नियमांध्ये स्वत: फार्मासिस्ट असणाऱ्या दुकान मालकांनाच औषध विक्री परवाना देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. जे परवानाधारक स्वत: फार्मासिस्ट नसतात त्यांनी रजिस्टर्ड फार्मासिस्टची नियुक्ती करुन औषधांची विक्री रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या देखरेखीखाली करणे आवश्यक आहे.

रजिस्टर्ड फार्मासिस्ट गैरहजर आढळल्यास कायद्यानुसार पेढीचे परवाने निलंबन वा रद्द ची कारवाई करण्यात येते. नातलगांना परवाने न देण्याबाबत कायद्यात कोणतीही तरतूद नसल्याने नियम ६४ नुसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथील तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत भांगे यांची बनावट स्वाक्ष-याचा आधार घेत मोठ्या रक्कमा घेऊन अनेक शिक्षकांना बदल्यांचे आदेश दिल्याबाबत**

**(२६) २८७५ (१५-०१-२०१५). श्री. हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत भांगे यांची रायगड येथे बदली झाल्यानंतर नविन सीईओ रुजु होईपर्यंत मिळालेल्या कालावधीचा फायदा उठवित भांगे यांच्या बनावट स्वाक्ष-याचा आधार घेत मोठ्या रक्कमा घेऊन अनेक शिक्षकांना बदल्यांचे आदेश दिल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१५) :** (१) होय. नमूद प्रकरणी विविध पोलीस ठाण्यात १० गुन्हे दाखल आहेत.

(२) व (३) होय. नांदेड जिल्हा परिषदेच्या ३ आरोपी शिक्षकांनी बदलीचे बनावट आदेश काढल्याचे व सदर बनावट आदेश १० शिक्षकांनी प्राप्त केल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथे शालेय पोषण आहाराचे काम स्थानिक महिला बचत गट, परित्यक्ता, विधवा, निराधार महिलांना देण्याबाबतची मागणी**

**(२७) २९०० (२२-१२-२०१४). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, (जि.ठाणे) मधील शालेय पोषण आहाराचे काम स्थानिक महिला बचत गट, परित्यक्ता, विधवा, निराधार महिलांना द्यावे अशी मागणी भिवंडी जनआंदोलन समितीचे सचिव यांनी तत्कालीन मा.महिला व बालविकास मंत्री, सचिव, आयुक्त व जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे गत ६ महिन्याच्या काळात अनेक वेळा दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात पंचायत समिती कार्यालयासमोर जनआंदोलन समिती कार्यकर्त्यांनी लाक्षणिक उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१), (२) व (३) भिवंडी तालुक्यातील ३८६ शाळांपैकी १५८ शाळांतील शाळा व्यवस्थापन समित्यांनी नाईक फांऊडेशन या स्वयंसेवी संस्थेमार्फत शालेय पोषण आहार शिजवून घेण्याचा निर्णय घेतलेला असून यानुसार सदर शाळांना नाईक फाउंडेशन मार्फत शालेय पोषण आहार शिजवून देण्यात येत आहे. उर्वरित २२८ शाळांच्या शाळा व्यवस्थापन समित्यांनी आहार शिजविण्यासाठी महिला बजत गट / स्थानिक स्वयंपाकी तथा मदतनीस यांची नियुक्ती केलेली असून त्यांचेमार्फत शालेय पोषण आहार शिजवून देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना (जि.औरंगाबाद) शहरातील जिल्हा क्रिडा संकुलाची झालेली दुरावस्था**

**(२८) ३११८ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.औरंगाबाद) शहरातील जिल्हा क्रीडा संकुलाची कोटयवधी रुपये खर्च करुन उभारणी करण्यात आली व ते अद्यापही अपुर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा संकुलात उभारण्यात आलेल्या गॅलरीचे वादळामुळे नुकसान झाले आहे तसेच दोन वर्षापासून प्रेक्षक गॅलरी दुरुस्त होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा संकुलाचे संपूर्ण नुतनीकरण करण्याची मागणी क्रीडा प्रेमी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) व (४) नाही. तथापि, वादळामुळे नुकसान झालेल्या प्रेक्षक गॅलरीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल समिती, जालना यांच्यामार्फत कार्पोरेट सोशल रिस्पॉसिंबिलीटी ॲक्ट अंतर्गत (CSR) जालना जिल्हा उद्योजक असोसिएशनकडे सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज शहरात गस्ट्रोच्या साथीला आळा घालण्याबाबत**

**(२९) ३६६७ (१५-०१-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज शहरात गॅस्ट्रोची साथ पसरल्याने शहरातील गॅस्ट्रोच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील पाहणी केली आहे काय, पहाणीत काय आढळून आले व शहरातील गॅस्ट्रोच्या साथीला आळा घालण्यासाठी कोणती तातडीने उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.

मिरज शहरात दिनांक १९.११.२०१४ ते ०५.१२.२०१४ या कालावधीत उद्भवलेल्या गॅस्ट्रो (कॉलरा) उद्रेकात एकूण ६८२ एवढे रुग्ण आढळून आले. शहरातील जुनी पाईप लाईन व त्यातील गळती यामुळे ही साथ उद्भवली.
साथरोग नियंत्रणाकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेतः-

- रुग्ण सर्वेक्षण व उपचार
- बाधित भागातील पाणी नमुने तपासणी
- ओ.टी.तपासणी
- नेहमीच्या क्लोरीन मात्रेत वाढ
- शहरात पाणी पुरवठा लाईन मधील विविध ठिकाणी आढळलेल्या गळत्या दुरुस्ती.
- पाण्याच्या नवीन लाईनवर कनेक्शन जोडणी.
- पाणी पुरवठा करणा-या टाक्यांची स्वच्छता.
- आरोग्य शिक्षण

वरील उपाययोजना मिरज शहरात उद्भवलेली गॅस्ट्रोची साथ नियंत्रणात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेकडे चारचाकी वाहनांच्या पार्किंगच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती**

**(३०) ३७११ (१५-०१-२०१५). श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये वाढती रहदारी आणि पार्किग विषयक समस्यांवर उपाय म्हणून मुंबई पोलिसांच्या वाहतुक शाखेने मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव दिला आहे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावाबाबत काय उपाययोजना केल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई शहरातील वाढती रहदारी आणि पार्किंग समस्यांवर उपाय म्हणून सादर केलेल्या प्रस्तावामध्ये दक्षिण मुंबईमध्ये १५,००० वाहनतळे, पश्चिम मुंबईमध्ये १५,००० वाहनतळे, उत्तर मुंबईमध्ये १०,००० वाहनतळे आणि पूर्व उपनगरामध्ये १०,००० वाहनतळे निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे नमुद केले आहे. शासन व महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या मोकळ्या जागा, मैदाने अशा ठिकाणी भूमीगत तसेच बहुमजली वाहनतळे उभारण्याचे उक्त प्रस्तावामध्ये सुचविण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वाहतूक व्यवस्थापनेचा अभ्यास करणारा स्वतंत्र अभियांत्रिकी विभाग असून मुंबई शहराचा सर्वसमावेशक चलनशीलतेचा अभ्यास आराखडा (Comprehensive Mobility Plan) तयार करण्याचे काम सुरू आहे. वाहतूक विभागाने महापालिका हद्दीतील पार्किंगचा अभ्यास करुन सर्वकष सामाईक धोरण तयार केले आहे. या धोरणांतर्गत रस्त्यावरील व रस्त्यालगतची वाहनतळे यांची व्यापारक्षेत्रे, कार्यालयीन संकुले व रहिवाशी क्षेत्रे इ. बाबींचा विचार करुन तीन विभागात वर्गवारी केली आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेडून २०१३-२०३४ चा विकास नियोजन आराखडा व सुधारित विकास नियंत्रण नियमावली (DCR) करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा तालुक्यातील कुकडी कालव्यासाठी संपादित जमिनीचा मोबदला मिळणेबाबत**

**(३१) ३९७१ (२३-१२-२०१४). श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मदती व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील कुकडी कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा सदर जमीनधारकांना नवीन नियमानुसार मोबदला दिला गेला नाही, खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबदला देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ११ सोलापूर कार्यालयास प्राप्त झालेल्या भूसंपदानाच्या १७७ प्रकरणांमध्ये खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी करावयाची असल्याने त्यामध्ये प्राप्त २/३ रक्कम रु. २,६३,५९,९२६/- कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम, कोळवडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर कार्यालयाकडे परत पाठविण्यात आलेली आहे.

दिन. १८.११.२०१३ च्या शासन निर्णयानुसार उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ४ (करमाळा) सोलापूर हे कार्यालय उपविभागीय अधिकारी, माढा कार्यालयात समर्पित करण्यात आले आहे, सदर कार्यालयाची अभिलेख हस्तांतरण प्रक्रिया मार्च, २०१४ मध्ये पूर्ण झालेली आहे. समर्पित भूसंपादन कार्यालयाकडून उपविभागीय अधिकारी, माढा या कार्यालयाकडे एकूण ५२ प्रकरणे प्राप्त झाली असून त्यापैकी ५ प्रकरणांमध्ये प्रारुप निवाडा मंजूर झालेला आहे. त्यापैकी ५ प्रकरणामध्ये प्रारुप निवाडा मंजूर झालेला आहे. दाने प्रकरणे कलम ९(३) (४) च्या चौकशीवर आहेत व उर्वरित ४५ प्रकरणे तत्कालीन कार्यालयामध्ये कलम ४ ची कलम ६ ची अधिसूचना काढणे यावर व्यपगत झालेली असल्याने नवीन भूसंपादन कायदा, २०१३ अनुसार कार्यवाही करण्यासाठी संपादन मंडळास परत पाठविण्यात आलेली आहेत.

---

### रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) येथील राष्ट्रीय महामार्ग १४ मनसर ते मानेगांव टेक च्या दुरुस्तीबाबत

**(३२) ४००३ (२३-१२-२०१४). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) येथील राष्ट्रीय महामार्ग १४ मनसर ते मानेगांव टेक कि.मी. ६८९/०० ते ६५२/०० हा मार्ग नादुरुस्त असून जागोजागी खड्डे पडले असल्यामुळे दररोज अपघाताच्या घटना घडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाकडे रस्ता दुरुस्तीसाठी कार्यवाही करण्याबाबत विचारणा केली आहे काय,

(३) असल्यास, रस्ता दुरुस्ती करण्याबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०६-२०१५) :**(१) नाही.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) येथील राष्ट्रीय महामार्ग १४ मनसर ते मानगांव टेक कि.मी. ६८९/०० ते ६५२/०० या लांबीतील रस्त्याचे डांबरी पृष्ठभागाचे खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. नियमित देखभाल दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल तालुक्यातील उलवे येथील गावातील सर्व्हे क्र. ५१ मध्ये असलेली १५७ एकर गुंठे जमिनीवर राज्य शासनाचा काहीही हक्क नसताना शासन सदर जमीन १९७३ पासून वापरत असल्याबाबत.**

**(३३) ४०७४ (२२-१२-२०१४). श्री. नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील उलवे येथील गावातील सर्व्हे क्र. ५१ मध्ये असलेली १५७ एकर गुंठे जमीन ही नियोजित नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळासाठी वापरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही जमीन बिवलकर कुटुंबियांची आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित जमिनीवर राज्य शासनाचा काहीही हक्क नसताना शासन सदर जमीन १९७३ पासून वापरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जमीन वापरण्याच्या मोबदल्यात राज्य शासनाला नुकसान भरपाई देण्याचे हायकोर्टाचे निर्देश आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निर्देशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०६-२०१५) :** (१) खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) मा.उच्च न्यायालयाचे आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२३.२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे व सदर बाब सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

---

**राज्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार मिळविणाऱ्या शिक्षकांना सन्मानचिन्ह व दोन वेतनवाढ मिळण्याबाबत**

**(३४) ४१२४ (२२-१२-२०१४). श्री. अमित झनक (रिसोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार मिळविणाऱ्या शिक्षकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्रासोबत दोन वेतनवाढ देण्याची घोषणा करण्यात येवूनही सदरहू शिक्षकांना अद्यापी वेतनवाढ देण्यात आली नसल्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांना दोन वेतनवाढ मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन वाढीचा दर अद्याप निश्चित झालेला नाही. तथापि राज्य व राष्ट्रीय आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीऐवजी ठोक रक्कम रु.१ लाख देण्यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक ४/९/२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदर शासन निर्णय सन २०१३-१४ व त्यापुढील वर्षाकरीता लागू करण्यात आला आहे.
सन २००५-०६ ते २०१२-१३ अंतर्गत आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**वाशिम जिल्हयातील ग्रामीण रूग्णालय, रिसोड येथील**
**वैद्यकीय अधिक्षकासह अनेक रिक्त पदाबाबत**

**(३५) ४२७२ (२३-१२-२०१४). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील ग्रामीण रूग्णालय, रिसोड येथे वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे रूग्णसेवेवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकिय अधिक्षकासह कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यांबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०६-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
वैद्यकीय अधिका-यांची सर्व पदे भरलेली आहे. तर वैद्यकीय अधिक्षकाचे-१ व वर्ग-३ व ४ मधील २३ पैकी ८ पदे रिक्त आहेत.
(२) नाही.
वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचा-यांमार्फत रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येत असल्यामुळे रुग्णसेवेवर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.
(३) वैद्यकीय अधिक्षकाचे पद भरण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली असून शासनमान्यतेने पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तर वर्ग -३ व वर्ग-४ ची रिक्त पदे उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांचे स्तरावर भरण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी शिकवणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शुल्क नियंत्रण कायदा अमंलात आणण्याबाबत**

**(३६) ४७७२ (२२-१२-२०१४). श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शिकवणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाने केलेला कायदा दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी पासून लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सदर कायदयाची अंमलबजावणी होत आहे काय,

(३) असल्यास, शाळेतील शिक्षक खाजगी शिकवण्या घेतात शिकविण्याच्या नावावर विद्यार्थ्यांची लूट व लैंगिक अत्याचार ही होत आहेत यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कारवाई तसेच उपाययोजना केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) खाजगी शिकवणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मा.अशोक प्रधान सिमितीने केलेल्या शिफारशी स्वीकारण्याबाबत शालेय शिक्षण विभागाच्या तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संचालकांनी एकमेकांशी विचारविनियम करुन एकत्रित अभिप्राय / मसुदा सादर करण्याबाबबत कळविण्यात आले आहे.

---

**भाटशिरपुरा (ता.कळंब,जि.उस्मानाबाद ) येथील जिल्हा परिषद शाळांच्या वर्ग खोल्यांचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) ४८२५ (२२-१२-२०१४). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाटशिरपुरा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्यांचा प्रस्ताव जिल्हा परिषद, उस्मानाबाद प्रशासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेसाठी जिल्हाधिकारी यांनी १ हेक्टर जागा उपलब्ध करुन दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या वर्ग खोल्यांना मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अशा प्रकारचे आणखी किती प्रस्ताव प्रलंबित आहेत व प्रलंबित प्रस्तावाबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०६-२०१५) :**(१), (२) व (३) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ३ वर्गखोली बांधकामाकरिता रु.१२.९१ लक्ष मंजूर करण्यात आले असून बांधकाम पूर्ण झालेले आहे. सन २०१४-१५ मध्ये ३ वर्गखोली बांधकाम मंजूर केलेले आहे.

(४) उस्मानाबाद जिल्ह्याकरिता २१२ वर्गखोलीची आवश्यकता असून ७५ वर्गखोली बांधकामास निधी मंजूर आहे. सबब ज्या शाळेकरीता वर्गखोली बांधकामाची अतिशय निकड आहे अशा वेगवेगळ्या शाळांना ७५ वर्गखोली बांधकाम मंजूर केलेले आहे. उर्वरित शाळांना सन २०१५-१६ मध्ये निधी उपलब्ध करण्याची मागणी केली आहे. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात केंद्र शासनाच्यावतीने २३४ नेहरु युवा केंद्र सुरु करण्याबाबत**

**(३८) ५१८१ (०९-०४-२०१५). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात केंद्र शासनाच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या नेहरु युवा केंद्राच्या माध्यमातून सुमारे ५५३ गावांत नेहरु युवा केंद्राची नोंदणी करण्यात आली परंतु त्यापैकी २३४ नेहरु युवा केंद्रे अद्यापही कार्यरत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित असलेली २३४ नेहरु युवा केंद्र त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१), (२) व (३) नेहरु युवा केंद्रे सुरु करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.

---

**मद्य पिऊन वाहन चालविणा-यांची तपासणी करण्यासाठी**
**पुरेसे ब्रेथ ॲनालायझर्स उपलब्ध नसल्याबाबत**

**(३९) ५१९५ (०६-०४-२०१५). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री. भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिस दलाने मद्य पिऊन वाहन चालविणा-यांची तपासणी करण्यासाठी 'ब्रेथ ॲनालायझर्सची' शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रेथ ॲनालायझर्स वेळीच न मिळाल्याने अपु-या यंत्रसामग्रीमुळे मद्यपी वाहनचालकांच्याविरुध्द कारवाई करण्यात पोलिसांना अडचण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांना पुरेसे ब्रेथ ॲनालायझर्स उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५)** :(१) व (२) हे खरे आहे.

(३) निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर व खरेदी झाल्यानंतर संबंधित घटकांना ब्रेथ ॲनालायझर पुरविण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी कुटूंबासाठी खरेदी करण्यात आलेल्या गॅस शेगड्या शासकीय गोदामांत पडून असल्याबाबत**

**(४०) ५२८९ (१०-०४-२०१५). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री. डी.एस.अहिरे (साक्री), श्री. अमित झनक (रिसोड), श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. संजय कदम (दापोली), श्री. राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. सदा सरवणकर (माहिम), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री. पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००६-०७ या वर्षात शासनाने दारिद्रय रेषेखाली असलेल्या ८ लाख आदिवासी कुटुंबियांना मोफत गॅस संच पुरविण्याचा निर्णय घेतला असून सदर गॅस शेगड्यांसाठी ४२ कोटी ४८ लाख ४५ हजार रुपयांच्या निधी राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुपये खर्चून खरेदी केलेल्या १ लाख २३ हजार ९९१ गॅसशेगड्यांपैकी जवळपास २६ हजार ३०८ शेगड्या मागील ९ वर्षापासून यवतमाळ, नंदूरबार, जव्हार व चंद्रपूरमधल्या शासकीय गोदामात पडून आहे, तसेच नाशिक जिल्ह्यात ह्या शेगड्या भंगारात काढण्यात येणार असल्याची गंभीर बाब दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गॅस शेगड्यांचे वाटप न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त गॅस शेगड्यांचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०६-२०१५) :** (१) होय.

(२) खरेदी केलेया १,२३,९९१ गॅस शेगड्यापैकी ९८,४६४ शेगड्यांचे वाटप करण्यात आले असून २५,५२७ शेगड्या गोदामात शिल्लक आहेत. तथापि, शेगड्या भंगारात काढण्यात येणार असल्याची बाब खरी नाही.

(३) व (४) सदर योजना वन विभागाकडे वर्ग करण्याबाबत व गॅस शेगड्या वन विभागास हस्तांतरित करण्याबाबतचा निर्णय २०१३ मध्ये झाला होता. तथापि, वन विभागाने सदर शेगड्या स्वीकारल्या नसल्याने महामंडळाकडे २५,५२७ शेगड्या शिल्लक असून त्या सुस्थितीत आहेत. आदिवासी लाभार्थ्यांना गॅस शेगड्यांचे वाटप त्वरीत व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी, तिनही पेट्रोलियम कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, राज्य समन्वयक तेल उद्योग तसेच वीजतंत्री यांच्यासमवेत वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. गॅस वितरकांवर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचे नियंत्रण असल्याने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन गॅस वितरकांनी आदिवासी लाभार्थ्यांना त्वरीत जोडण्या देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय झाल्यानंतर शासनाच्या आदेशाप्रमाणे म्हाडाने ४६ हजार ९९ अर्जदारांमधून पहिली लॉटरी काढल्याबाबत

**(४१) ५३२३ (०७-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ. पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय झाल्यानंतर शासनाच्या आदेशाप्रमाणे म्हाडाने ४६ हजार ९९ अर्जदारांमधून दिनांक २८ जून, २०१२ रोजी पहिली लॉटरी काढली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिली लॉटरी काढून अडिच वर्ष होऊन अद्याप गिरणी कामगार घरांच्या प्रत्यक्ष वितरणाचे काम पूर्ण झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व पहिल्या लॉटरीतील गिरणी कामगारांना घरे वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मुंबईतील १९ कापड गिरण्याच्या कामगारांकरिता त्या गिरण्यांच्याकडून म्हाडास उपलब्ध झालेल्या जमिनीवर एकूण ६९४८ सदनिका बांधण्यात आल्या असून त्यापैकी २३ सदनिका संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांना वाटप

करण्यासाठी राखीव ठेवून उर्वरित ६९२५ सदरनिकांसाठी दि.२८.६.२०१२ रोजी म्हाडामार्फत सोडत काढण्यात आली. सोडतीत यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे छाननी करण्यात येवून पात्र आढळलेल्या ५३४० गिरणी कामगारांना घराचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला. उर्वरित १५८५ अर्जदारांना वाटप प्रक्रिया चालू आहे. तसेच जे. गिरणी कामगार मयत आहेत. अशा गिरणी कामगारांच्या वारसांना शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरल्यानंतर घरांचा ताबा देण्यात येत आहे.

---

**राज्यात मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(४२) ५३७५ (१०-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लीम समाजातील विशेष मागासवर्गीय प्रवर्गाला ५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा आणि मुस्लिम समाजाला एकाचवेळी आरक्षणाचा निर्णय घेतलेला असतानासुध्दा केवळ मराठा आरक्षणाच्या निर्णयासाठीचे विधेयक माहे डिसेंबर, २०१४ च्या अधिवेशनात विधीमंडळाने मंजूर केले, परंतु मुस्लिम आरक्षणाचे विधयेक विहित मुदतीत मंजूर केले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समाजाच्या आरक्षणाचे विधेयक विहित मुदतीत मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच यासंर्दभात सदरील समाजाला आरक्षण मिळावे याकरिता लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) याबाबत नमुद करण्यात यते की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णय विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) होय.

(५) याबाबत नमुद करण्यात येते की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णय विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**बाणकोट (ता.मंडणगड,जि.रत्नागिरी) या किल्ल्याचे काम निकृष्ट झाल्याबाबत**

**(४३) ५४०५ (०७-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाणकोट (ता.मंडणगड,जि.रत्नागिरी) या ऐतिहासिक किल्ल्यांच्या बाहेरील करण्यात आलेले दुरुस्तीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे किल्ल्याची पडझड सुरुच असल्याने तसेच येणा-या पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे पर्यटकांची संख्या घटत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने किल्ल्यांच्या दुरुस्तीचे निकृष्ट काम करणा-या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय व किल्ल्यांच्या दुरुस्तीचे काम चांगल्या दर्जाचे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

पुरातत्व संचालनालयाने या किल्ल्याची दुरुस्ती करण्याबाबतची कोणतीही कामे केलेली नाहीत. सदर किल्ल्याच्या जतन दुरुस्तीचे काम जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडून करण्यात आलेली आहे.

(२) सदर किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम पुरातत्व विभागाकडून करण्यात आलेले नसल्यामुळे ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. बाणकोट किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतची अंतिम अधिसूचना माहे मार्च, २०१५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली असून पुरातत्व संचालनालय जतन दुरुस्तीची अंदाजपत्रके बनवून निधीच्या उपलब्धतेनुसार किल्ल्याची डागडुजी करण्यात येईल. किल्ल्यात एक विहिर आहे. तिची सफाई करुन पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विमानतळ येथे वाढलेल्या पार्किग शुल्कामुळे विमानतळाशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या टुरिस्ट गांड्यांच्या पार्किग पार्ले येथे वाढल्याचे निदर्शनास आल्याबाबत**

**(४४) ५५७१ (०७-०४-२०१५). श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळ येथे वाढलेल्या पार्किग शुल्कामुळे विमानतळाशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या टुरिस्ट गांड्यांच्या पार्किग पार्ले येथे वाढल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमानतळाचे पार्किग शुल्क वाढल्याने टुरिस्ट गाड्यांचे मालक आणि चालक सदरहू खर्च वाचविण्यासाठी पार्ल्याच्या गल्लोगल्लीत गाड्या उभ्या करित असल्याने स्थानिक नागरीकांना वाहन चालविण्याबरोबर रस्त्यावर चालणे देखील कठीण झाले आहे, हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) विलेपार्ले पूर्व परिसरातील काही रस्त्यांवर टुरिस्ट गाड्या अनधिकृतपणे उभ्या केल्या जातात, हे खरे आहे.
(२) विलेपार्ले परिसरात अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या २८७ टुरीस्ट वाहनांवर सन २०१५ मध्ये वाहतूक पोलीसांनी कारवाई केली आहे. विलेपार्ले पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाजीवाडी जंक्शन येथे टुरीस्ट गाड्या जास्त प्रमाणात पार्क करण्यात येत असल्यामुळे या ठिकाणी पोलीस ठाण्याकडून एक मोबाईल वाहन व स्थिर पहारा ठेवण्यात आला आहे. तसेच वाकोला वाहतूक विभागाकडून विलेपार्ले पूर्व येथील अनधिकृत पार्किंगवर कारवाई करण्यासाठी स्वतंत्रपणे खाजगी कर्षित वाहन नियुक्त करण्यात आले आहे. या परिसरात अनधिकृपणे पार्किंग करणाऱ्या गाड्यांवर वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औढां नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील गोळेगाव कृषि महाविद्यालयासाठी निधीचा प्रस्ताव धूळ खात असल्याबाबत**

**(४५) ५६५४ (०७-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औढां नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील गोळेगाव येथे मोठा गाजावाजा करुन सुरु करण्यात आलेल्या कृषी महाविद्यालयातील व विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने कृषि महाविद्यालयासाठी निधीचा प्रस्ताव धूळ खात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील जिल्ह्यात एकही शासकीय कृषी महाविद्यालय नसल्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे आढळून येत आहे,
(३) असल्यास, शासनाकडून उर्वरित निधी कधी मिळणार या प्रतीक्षेत महाविद्यालय असून याबाबत शासन काय निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) वसंतराव नाईक मराठावाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत गोळेगाव, तालुका औंढा, जिल्हा हिंगोली येथील कृषी महाविद्यालयासाठी सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये एकूण रु.२२५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

**हिंगोली शहरातील पलटन भागातील जिल्हा कामगार कार्यालयाचा कारभार अजूनही निजामकालीन इमारतीत चालत असल्याने व ही इमारत पूर्ण जिर्ण झाली असून मोडकळीस आल्याबाबत**

**(४६) ५६६५ (०७-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरातील पलटन भागातील जिल्हा कामगार कार्यालयाचा कारभार अजूनही निजामकालीन इमारतीत चालत असल्याने व ही इमारत पूर्ण जीर्ण झाली असून मोडकळीस आली आहे असे दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचा पुनर्विकास करुन तिथे योग्य त्या कार्यालयीन सोयी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरण व महानिर्मिती या दोन्ही कंपन्यांमधील भांडवली खर्च हा खासगी कंपन्यांपेक्षाही अधिक असल्याबाबत**

**(४७) ५६८२ (०४-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण व महानिर्मिती या दोन्ही कंपन्यांमधील भांडवली खर्च हा खासगी कंपन्यांपेक्षाही अधिक असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील खर्चावर नियंत्रण नसल्याने राज्यात वीज महाग झाली असल्याने औद्योगिक विकासाला अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण व महानिर्मितीचा कारभार वीज आयोगाने ठरविलेल्या धोरणानुसार चालवावा व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायमूर्तींची नियुक्ती करावी अशी मागणी वीज ग्राहक संघटनेच्या अध्यक्षांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने  काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायमूर्तींची नियुक्ती करण्याबाबत मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

(४) पद रिक्त नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दुष्काळाची स्थिती सुधारण्याबाबत

**(४८) ५७८० (०४-०४-२०१५). श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये आणखी ५७०० गावांची भर पडली असून आता ही संख्या २४ हजार ७०० च्या घरात पोचली असल्याने केंद्रीय पथकाने केल्या पाहणीनंतर दुष्काळग्रस्त गावांमध्ये वाढ झाल्याने दुष्काळग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत मिळण्याकरीता सुधारीत निधीचा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुष्काळाची स्थिती सुधारण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०६-२०१५) :**(१) होय.

(२) सन २०१४ मधील खरीप रब्बी हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या अनुक्रमे २३,८११ व १,२५३ गावांमध्ये टंचाईसदृष्य परिस्थिती जाहीर करण्यात आल असून तेथे विविध सोयी/सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच खरीप हंगामातील बाधित शेतक-यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी रु.४.०००/- कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर मधील बावनथडी प्रकल्पग्रस्ताचे अद्यापी**
**पुर्नवसन करण्यात आले नसल्याबाबत**

**(४९) ५७९५ (०६-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील बावनथडी प्रकल्पात अनेक शेतक-यांनी शेती व घरे अधिग्रहित करण्यात येवूनही त्यांचे अद्यापी पुनर्वसन करण्यात आलेले नाही तसेच ज्यांचे पुनर्वसन करण्यात आले त्यांना कोणत्याही मुलभूत सुविधा देण्यात आलेल्या नसल्यामुळे त्यांनी वारंवार आंदोलन करण्यात येवून उपोषणही करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याकरिता तसेच ज्यांचे पुनर्वसन करण्यात आले त्यांना सर्व मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले असून एकूण ७५६ पैकी ७५३ बाधी (९९.६०%) कुंटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत. पुनर्वसीत गावठाणात सर्व १८ मुलभुत नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील तीनशे दुग्ध विकास संस्था बंद**
**होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(५०) ५८१८ (०४-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात पशुधनामुळे शेतक-यांकडून शासकीय व खाजगी डेरीना पुरक म्हणून दुधाचा व्यवसाय केला जात असून सदर कोरडवाहू जमीन आणि सिंचनाच्या पुरेशा सोयी नसल्याने दुष्काळाच्या परिणामामुळे तेथील सद्यःस्थितीतील सुमारे तीनशे दुग्ध विकास संस्था बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्यावतीने दुग्ध व्यवसायासाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
धुळे जिल्ह्यातील ४ तालुक्यांमध्ये प्रत्येकी १ कृषी पूरक उत्पादक संघ असून त्यांच्याशी संलग्न अशा ३६५ नोंदणीकृत प्राथमिक दूध उत्पादक सहकारी संस्था आहेत. ४ दुध संघापैकी ३ संघ कार्यरत असून १ संघ अवसायनात गेला आहे. ३६५ प्राथमिक दूध उत्पादक संस्थापैकी ८१ संस्था कार्यरत असून २८४ संस्था बंद अवस्थेत आहेत.
(२) व (३) केंद्र शासनाच्या वतीने दूध व्यावसायिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संघाचे पुनर्वसन योजना, स्वच्छ दूध उत्पादन योजना व राष्ट्रीय कृषी विका योजनेअंतर्गत वेगवर्धक दूध विकास कार्यक्रम व राष्ट्रीय पुरक प्रथिने अभियान या योजनेअंतर्गत सरकारी दूध संघाना व सभासद दूध संस्थांना अर्थसहाय्य करण्यात येते. तसेच राज्य स्तरावरील जिल्हास्तरीय एकात्मिक दुग्ध विकास कार्यक्रमांतर्गत स्वच्छ व दर्जेदार दूध संकलन संस्थांना होण्यासाठी बल्क मिल्क कुलर, मिल्को टेस्टर बसविण्यासाठी संस्थाना ७५ टक्के अनुदान देण्यात येते. सन २०१५-२०१६ मध्ये धुळे जिल्ह्यातील कार्यरत ८१ संस्थापैकी २३ दूध उत्पादक संस्थांना ७५ टक्के अनुदानाने संगणक सचिव सयंत्र पूरवठा कामी निधी मागणीच्या प्रस्तावास जिल्हा नियोजन समिती, धुळे यांनी तत्वत: मान्य केला आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.